मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या 16 शाळांमध्ये झिरो वेस्ट प्रकल्प राबवणार

## आयुक्त शेखर सिंह यांची खर्चास मान्यता: महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये झिरो वेस्ट कचरा मोहीम



**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना लहानपणापासून कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी, त्यांची कचरा व्यवस्थापनावर जनजागृती व्हावी, याकरिता महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये झिरो वेस्ट कचरा मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये शून्य कचरा प्रकल्प राबविण्यासाठी पुढील १६ शाळांची निवड करण्यात आली. या प्रस्तावास महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समिती सभेत मान्यता दिली.

शहरात स्वच्छ पिंपरी-चिंचवड शहर अभियान राबवण्यात येत आहे. महापालिकेच्या शाळा कचरामुक्त व्हाव्यात, याकरिता प्राथमिक व माध्यमिक शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा (झिरो वेस्ट शाळा) हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाचा भाग म्हणून महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत झिरो वेस्ट शाळा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती करून त्यांच्यात लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये तीन महिन्यांमध्ये एकूण ४ टप्प्यांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार असून त्यासाठी शाळांना निधी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण १०५ शाळा या उपक्रमाअंतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या १०५ शाळांपैकी मे. आसरा फाउंडेशन या संस्थेला झिरो वेस्ट (शून्य कचरा) शाळा उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील ८ शाळा प्रायोगिक तत्त्वावर देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ८ शाळा, दुसऱ्या टप्प्यात १६ शाळा, तिसऱ्या टप्प्यात १६ शाळा , चौथ्या टप्प्यात १६ शाळा यानुसार १०५ शाळांपैकी ५६ शाळा झिरो वेस्ट (शून्य कचरा) करण्यात आला आहेत.

यामध्ये अ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील निगडी येथील विद्यानिकेतन मुलांची व मुलींची शाळा, ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील काळेवाडी मुलांची व मुलींची शाळा, क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील खराळवाडी येथील उर्दू शाळा, जाधववाडी येथील उर्दू प्राथमिक शाळा, ड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील कस्पटे वस्ती शाळा, ई क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील भोसरी येथील मुलांची व मुलींची शाळा, फ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील निगडी येथील मुलांची व मुलींची शाळा, क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील खिंवसरा पाटील मुलींची शाळा, कर्मवीर भाऊराव पाटील शाळा, थेरगाव उर्दू शाळा, ह क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक शाळा, संत तुकारामनगर प्राथमिक शाळा या शाळांचा समावेश असून या शाळेमध्ये झिरो वेस्ट प्रकल्प राबवण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

### या बैठकीत मंजूर झालेले विषय...

**» शहरातील विविध परिसरातील रस्त्यांची आधुनिक पद्धतीने दुरुस्ती करणे, शहरात विविध ठिकाणी पाईपलाईन टाकण्यासाठी अडथळा येणाऱ्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या उच्च व लघुदाब वीजवाहिन्या स्थलांतरित करणे , विविध प्रभागातील स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे आदी विषयांच्या खर्चास प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली.**

# पर्यटकांच्या स्वागतासाठी हॉटेल, टेंट व्यावसायिक सज्ज

## थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागताला मावळात येणार पर्यटकांचा महापूर



**पिंपरी | प्रतिनिधी**

थर्टी फर्स्ट व नववर्षाच्या स्वागताला मावळात येणार पर्यटकांचा महापूर, दि.२५ – नाताळ सण आणि त्यानंतर लगेचच येणारे थर्टी फर्स्ट व नवीन वर्षाचा पहिला दिवस, हे सर्व दिवस साजरे करण्यासाठी राज्यभरातून पर्यटक मावळातील विविध पर्यटनस्थळी दाखल होत आहेत. खास सेलिब्रेशनसाठी मावळात दाखल होणाऱ्या या पर्यटकांच्या स्वागतासाठी तालुक्यातील ठिकठिकाणचे पर्यटन व्यावसायिक सज्ज झाले आहेत.

अलिकडच्या काळात लोणावळा, खंडाळा बरोबरच मावळ तालुक्याच्या इतर भागातही पर्यटक मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत. त्यामुळे तालुक्यात पर्यटन व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर विकसित झाला आहे. दर आठवड्याला शनिवार, रविवार आणि सुट्टीचे दिवस या काळात पुणे-मुंबई सह देशाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक मावळच्या विविध भागांना भेटी देत असतात.

मावळ तालुक्यातील लोणावळा, खंडाळा, कार्ला, वेहरगाव, मळवली, भाजे याठिकाणी थंड हवेची ठिकाणे म्हणून पर्यटक येतात. तर पवनानगर परिसरात अलिकडे अनेक पर्यटन केंद्रे विकसित झाली आहेत. त्यात पवना धरणाच्या काठी असणारे टेंट कॅम्पिंग प्रसिद्ध आहेत. या भागात सुमारे १५० ते २०० पर्यटन केंद्रे उभारली गेली आहेत. त्यामुळे दर विकेंडला व सुट्टीच्या दिवशी पर्यटक मोठ्या संख्येने या भागात येत असतात.

पर्यटनासाठी आपल्या भागात येणाऱ्या पर्यटकांच्या राहण्याची चांगली व्यवस्था व्हावी, भोजन व्यवस्था, चहापान, आवडी-निवडी यासह मनोरंजन बाबतही पर्यटन केंद्र धारक काळजी घेत असतात. संपूर्ण मावळ तालुक्यात सुमारे हजार ते दीड हजार पर्यटन केंद्रे विकसित झाली आहेत. यात काहींनी तंबू टाकून तर काहींनी कायमस्वरूपी बांधकामे करून पर्यटन केंद्र उभारलेली आहे.

# मराठीतून पोषण ट्रॅकर ॲपमुळे अंगणवाडी सेविकांचे काम सोपे

## इंग्रजीत माहिती भरणे कठीण जात होते



**पिंपरी | प्रतिनिधी**

सध्या अनेक क्षेत्रामध्ये ऑनलाईन पद्धतीने काम सुरू आहे. त्यामुळे अंगणवाडीदेखील अपडेट होत आहे. अंगणवाडीमध्ये सुरू असलेल्या कामकाजाची नोंद पोषण ट्रॅकर ॲपमध्ये केली जाते. मध्यंतरी पोषण ट्रॅकर ॲपमध्ये बदल करण्यात आला असून हे ॲप इंग्रजी भाषेतून होते. संपूर्ण माहिती इंग्रजी भाषेतून भरावी लागत असल्याने काही वयस्क अंगणवाडीसेविका तसेच काही सेविकांचे शिक्षण कमी असल्याने इंग्रजीत माहिती भरणे कठीण जात होते; मात्र, आता पोषण ट्रॅकर ॲप मराठी भाषेत झाल्याने अंगणवाडी सेविकांचे काम सोपे झाले आहे.

केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यतेनुसार राज्यात पोषण अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पोषण अभियानामध्ये रिअल टाईम मॉनिटरिंगअंतर्गत प्रत्येक अंगणवाडी सेविकांना व मुख्यसेविका तसेच तांत्रिक मनुष्यबळ यांना 2019 मध्ये स्मार्ट फोन उपलब्ध करून दिले होते. पिंपरी-चिंचवड शहरात एकूण 361 अंगणवाड्या आहेत. अंगणवाडी सेविकांनी 2021 मध्ये कामासाठी दिलेले स्मार्ट फोन कामांसाठी त्रासदायकच जास्त ठरू लागल्याने अखेर शासनाकडे जमा केले होते. त्या वेळी आम्हाला चांगले मोबाईल देऊन त्यामध्ये पोषण ट्रॅकर मराठी ॲप देण्याची मागणी केली होती. मात्र, तीन वर्ष झाले तरी नवीन स्मार्टफोन अंगणवाडी सेविकांना मिळाले नव्हते. त्यानंतर मे 2024 मध्ये नवीन स्मार्ट फोन मिळाले मात्र, पोषण ट्रॅकर ॲप इंग्रजी भाषेमध्ये होते. इंग्रजीमध्ये ॲप असल्याने अंगणवाडी सेविकांना माहिती भरणे कठीण जात होते.

# बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या तब्बल 16 हजार जागा रिक्त

## अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा तिढा सुटला असला तरी जागा वाढूनही विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी फिरकले नाहीत.

**पुणे | प्रतिनिधी**

दीड महिन्यांपासून खोळंबलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदवी (बी. फार्मसी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा तिढा सुटला असला तरी जागा वाढूनही विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी फिरकले नाहीत. तीन फेऱ्या संपल्यानंतर केवळ २७ हजार ५०० प्रवेश झाले आहेत. संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रिया राबवूनदेखील तब्बल १६ हजार १५१ जागा रिक्त आहेत.



विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने तसेच नवीन महाविद्यालये आणि तुकड्यांसंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध झाले नाहीत. त्यामुळे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया रखडली होती. पारंपरिक आणि काही व्यावसायिक अभ्यासक्रमांचे पहिले सत्र संपल्यानंतर औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या प्रवेश फेरीची सुरुवात झाली. ही फेरी २३ डिसेंबरपर्यंत सुरू होती.

पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये पदविका आणि पदवी अभ्यासक्रमाच्या सुमारे ६० टक्के जागांवर प्रवेश देण्यात आले. पदवी अभ्यासक्रमांसाठी तब्बल ५० हजार ६१० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २१ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी दोन फेऱ्यांत प्रवेशही घेतले. ६ डिसेंबरपासून तिसऱ्या प्रवेश फेरीची सुरुवात झाली. या फेरीला १६ डिसेंबरपर्यंत मुदत दिली होती. तीन फेऱ्यांपर्यंत ४३ हजार ५५१ जागा रिक्त होत्या. त्यापैकी आतापर्यंत २७ हजार ५०० जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. आता संस्थास्तरावर १८ ते २३ डिसेंबर या कालावधीत प्रवेश झाले. या फेरीनंतरदेखील १६ हजार १५१ जागा रिक्त आहेत.

पालक प्रतिनिधी संदीप पाटील म्हणाले, “ज्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांचा पर्याय खुला असतो. परंतु, राज्यसरकार निवडणुकांमध्ये गुंतून पडले. नवीन महाविद्यालये आणि तुकड्यांचा निर्णय घेतला गेला नाही. परिणामी लाखो विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. परिणामी तब्बल १६ हजार जागा रिक्त राहिल्या आहेत.”

नामांकित महाविद्यालयाचे प्राचार्य नाव न छापण्याच्या अटीवर म्हणाले, “एमबीबीएस, बीडीएस आणि अन्य वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांचा पर्याय असतो. परंतु दुर्दैवाने यंदाच्या वर्षी इतिहासातील सर्वात कमी म्हणजे तब्बल ४० टक्के जागा रिक्त आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून आमची मागणी आहे की, विधी अभ्यासक्रमांसाठीच्या धर्तीवर औषधनिर्माणशास्त्र प्रवेश प्रक्रियेवर फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे नियंत्रण असावे.”

### शैक्षणिक वर्ष कोलमडले

» प्रवेश प्रक्रिया लांबल्याने प्रथम वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष कोलमडले आहे. फार्मसी अभ्यासक्रमाच्या इतर वर्षातील नोव्हेंबर-डिसेंबर सत्र परीक्षांचे अनेक विद्यापीठाचे वेळापत्रक जाहीर झाले. परंतु अद्याप प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रियाच अपूर्ण आहे. त्यामुळे विद्यापीठांना आता या प्रक्रियेत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी वेगळे नियोजन करावे लागणार आहे.

# लवकरच मेट्रो स्टेशन ते विमानतळ विशेष बससेवा

## मेट्रो स्थानक ते घर परिसर अशी सुविधा सुरू करण्याचा मानस आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पीएमपीएमएल या प्रवासी वाहतूकीला पर्याय म्हणून महामेट्रोची सुविधा देण्यात आली. मात्र, महामेट्रोचे जाळे संपूर्ण पुणे शहरात पसरलेली नाही. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरपर्यंत मेट्रोची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे महामेट्रोच्या नजीकच्या स्थानकावरून विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच ज्या ठिकाणी मेट्रो मार्गिका नाही, त्या परिसरापर्यंत मेट्रो स्थानक ते घर परिसर अशी सुविधा सुरू करण्याचा मानस आहे.




त्यासाठी महामेट्रोला एक हजार बसची आवश्यकता आहे. तसेच ही सेवा अल्पदरात द्यायची असल्याने याबाबतचे नियोजन महामेट्रो आणि पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सुरू आहे. लवकरच ही सेवा उपलब्ध करून देणअयात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

चंद्रकात पाटील म्हणाले, वनाज ते रामवाडी ही मेट्रो विमानतळापर्यंत जात नाही, नवीन मार्गिका प्रस्तावित असल्या तरी त्या ठिकाणापर्यंत मेट्रो जाणे अशक्य आहे. यामुळे ज्या ठिकाणी मेट्रो स्टेशन आहे त्या ठिकाणाहून बससेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही बससेवा अल्पदरात असेल, तसेच महामेट्रोच्या स्टेशनवरून घराच्या परिसरापर्यंत विशेष बससेवा देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना प्रवास करताना एकसूत्रीपणा येणार आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मेट्रोकडे सक्षम पर्याय म्हणून पाहिले जाते. शहरात प्रत्येक ठिकाणी मेट्रो मार्गिकांच्या विस्तारासाठी काम सुरू आहे. २०३० पर्यंत पुणे शहरात सर्वच ठिकाणी मेट्रोचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. तसेच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे स्थलांतर करण्याचा विचार सुरू होता. त्यामुळे मेट्रो मार्गिकेच्या मूळ आराखड्यात आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आला नाही, असेही त्यांनी सांगितले.

# सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे शहराचे तिसरे स्थान कायम

## देशातील बंगळुरु आणि हैद्राबाद या शहरानंतर पुणे शहराचा सॉफ्टवेअर निर्यातीत सर्वाधिक वाटा आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात गेल्या पाच वर्षात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पुणे शहराने आघाडी घेतली असून आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. देशातील बंगळुरू आणि हैद्राबाद या शहरानंतर पुणे शहराचा सॉफ्टवेअर निर्यातीत सर्वाधिक वाटा आहे. त्यानुसार सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे शहराचा देशात तिसरा क्रमांक लागत असून तो कायम ठेवण्यात आला आहे. पुणे शहरातील हिंजवडीत १९९० मध्ये राजीव गांधी यांचे इन्फोटेक पार्क सुरू करण्यात आले. यानंतर खऱ्या अर्थाने आयटी क्षेत्राला मोठी चालना मिळाली.




केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत देशातील सॉफ्टवेअर निर्यातीची गेल्या पाच वर्षांतील आकडेवारीची माहिती सभागृहाला दिली. या आकडेवारीनुसार, देशातील सॉफ्टवेअर निर्यातीत बंगळुरू ४ लाख ७ हजार ७७ कोटी रुपयांची आपली यशस्वी घोडदौड कायम ठेवली आहे. यानंतर हैद्राबादने देखील १ लाख २१ हजार ११५ कोटी निर्यात केली आहे. तर १ लाख ५ हजार ८१८ कोटी रुपयांची निर्यात करीत पुणे शहराने आपले स्थान कायम ठेवले आहे.

सध्याच्या घडीला आयटी क्षेत्रात मोठी क्रांती झाली असून एआय या तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे जिल्हा देशात तिसऱ्या स्थानावर कायम आहे. परिणामी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पुण्याची कामगिरी चांगली राहिलेली आहे. मात्र, असे असतानाही हिंजवडी भागातील आयटी कंपन्यांचे मूलभूत प्रश्न अद्यापर्यंत सोडवण्यात आलेले नाहीत. यातच वाहतूक कोंडीची मोठी समस्या येथे निर्माण झाली आहे. यावर देखील अद्यापर्यंत तोडगा निघू शकलेला नाही. या समस्यांसंदर्भात उद्योग मंत्री उदय सामंत यांनी येथील कंपनीच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेत प्रलंबित असलेल्या समस्या सोडण्याची ग्वाही दिली.

# शहरातील फेरीवाल्यांचे भवितव्य अधांतरीच

## पात्र फेरीवाल्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्र नाही : महापालिकेने केवळ दिखावा केल्याचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने दोन वर्षांपूर्वी शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. मात्र, अद्यापही पात्र फेरीवाल्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. त्यामुळे विक्रेते संताप व्यक्त करीत आहेत. महापालिकेने फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाचा केवळ दिखावा केल्याचा आरोप केला जात आहे.



फेरीवाला नोंदणीनंतर शहर फेरीवाला समितीच्या आठ सदस्यांची निवडणूक २० ऑक्टोबर झाली. समितीचे आठ सदस्य निवडून आले. तरीही अद्याप फेरीवाल्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाहीत. तसेच, हॉकर्स झोनही निश्चित करण्यात आलेले नाहीत. प्रशासन कासव गतीने कारभार करीत असल्याने फेरीवाल्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेने सर्वेक्षणाचा निव्वळ फार्स केल्याचा आरोप केला जात आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने फेरीवाला कायद्यानुसार १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत शहरातील फेरीवाले व विक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. त्यात एकूण १८ हजार ६०३ फेरीवाल्यांची नोंदणी झाली. छाननी तसेच, सुनावणीत कागदपत्रांची पुर्तता न केल्याने काही अर्ज बाद करण्यात आले. शहरातील एकूण १५ हजार १३ फेरीवाले पात्र ठरले आहेत.

मात्र, सर्वेक्षण होऊन दोन वर्षे झाले तरी महापालिकेकडून ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले गेलेले नाहीत. संथ गतीने कारभार करणाऱ्या महापालिकेच्या भूमि आणि जिंदगी विभागाने तसेच, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांनी नोंदणीसाठी एक हजार रूपये शुल्क आकारले आहे. ओळखपत्र व प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी २०० रूपये शुल्क आहे. असे एकूण एक हजार ४०० रूपये शल्क ऑक्टोबरपासूनच आकारण्यात येत आहे. शुल्क घेतल्यावर तरी प्रमाणपत्र वा ओळखपत्र हातात पडेल, अशी अपेक्षा असणाऱ्या फेरीवाल्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

### क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीची प्रतीक्षा

» एक हजार ४०० रूपये शुल्क भरण्यास फेरीवाल्यांची प्रतिसाद कमी आहे. त्यांना शुल्क भरण्यास ३१ मार्च २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. शुल्क भरल्यानंतर त्यांना ओळखपत्र व प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. तसेच, ओळखपत्र व प्रमाणपत्रावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरीची प्रक्रिया शिल्लक आहे. ती पूर्ण झाल्यानंतर ओळखपत्रांचे वाटप सुरू करण्याचे नियोजन असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**क्षेत्रीय कार्यालयनिहाय फेरीवाल्याची संख्या**

**क्षेत्रीय कार्यालय - संख्या**

अ - ३ हजार ५७८
ब - १ हजार ५७५
क - २ हजार ४४
ड - ९१८
ई - १ हजार ३२५
फ - २ हजार २१८
ग - १ हजार २४७
ह - २ हजार १०८
**एकूण - १५ हजार १३**

### पात्र असूनही अतिक्रमण पथकाचा जाच

» सर्वेक्षणात आम्ही सर्व आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड आदी आवश्यक ती सर्व कागदपत्रे दिली आहेत. तसेच, एक हजार ४०० रूपये शुल्कही जमा केले आहे. ओळखपत्र व परवाना नसल्याने महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक वारंवार त्रास देत आहे. विक्रीचा माल जप्त करून घेऊन जात आहे, असे भाजी विक्रेते राजू कांबळे यांनी सांगितले.

# परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाला शालेय सहलींचा टेकू

## नव्या बसचा समावेश करण्याची होतेय मागणी : आगाराला 24 लाखांचे उत्पन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पिंपरी-चिंचवड आगाराचे घटत चाललेले उत्पन्न चिंताजनक असून, यंदा शालेय सहलींच्या निमित्ताने आगाराला काहीसा दिलासा मिळाला आहे. चालू वर्षी १६७ बस विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी आरक्षित झाल्या आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यातील आकडेवारीमध्ये ५६ हून अधिक बस बुक करण्यात आल्या आहेत. याविशेष बस सेवेमधून आगाराला २४ लाखांपेक्षा जास्त रूपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. दुसरीकडे, आगाराला नव्या गाड्यांची प्रतीक्षा असून अनेक गाड्यांनी किलोमीटरची मर्यादा ओलांडलेली आहे. त्यामुळे भविष्यामध्ये ही वाहने विद्यार्थ्यांना नेण्यासाठी धोकादायक ठरू शकतात.



महापालिकेच्या बहुतांश शाळांमध्ये सहलींसाठी बस सेवेला प्राधान्य देण्यात येते. खासगी वाहनांपेक्षा शासनाच्या एसटीलाच शाळांची पसंती मिळत आहे. काही दिवसांपुर्वीच शालेय सहल घेऊन जात असलेल्या खासगी वाहनाचा अपघात झाल्याने मोठी दूर्घटना घडली होती. अशा अनेक कारणाने शाळांची पसंती एसटीला असल्याचे दिसून येत आहे. त्याच प्रमाणे या बसचे दर अन्य खाजगी वाहनापेक्षा कमी असल्याने याला पसंती दिली जाते. शालेय सहलींमध्ये विशेष करून वाई, पाचगणी, श्रीवर्धन, दिवेआगार, पाली, रायगड, अलीबाग, ओझर, शिवनेरी, जेजुरी, प्रतिबालाजी आणि नारायणपुर आदी ठिकांना भेटी दिल्या जात आहेत. दरम्यान, पिंपरी-चिंचवड आगारातून या मार्गाला सर्वाधिक बस आहेत. त्यामुळे एसटी प्रशासनालादेखील हा मार्ग अधिक सोयीचा ठरतो. आगारांमध्ये नव्याने बस उपलब्ध झाल्यास खासगी शाळादेखील एसटी बसने शी आयोजित करण्यास प्राधान्य देऊ शकतील.

### गत वर्षीपेक्षा नऊ लाख अधिक कमावले

» पिंपरी-चिंचवड आगारातून गेल्या वर्षीपेक्षा यंदा शालेय सहलींच्या माध्यमातून जवळपास नऊ लाख रुपये अधिक कमावले आहेत. २०२३ मध्ये सहलींच्या माध्यमातून १५ लाख ७८ हजार रुपये उत्पन्न मिळाले होते. ते यंदा ८ लाख ९८ हजाराने अधिक म्हणजेच २४ लाख ७८ हजार रुपयाची नोंद झाली आहे. त्याचप्रमाणे पुढील दोन महिन्यांसाठी बस आरक्षित केल्या आहेत. डिसेंबर महिन्यात २७ शाळांच्या ८१ बस बुक असून, जानेवारी महिन्यात ३७ शाळांच्या ८१ बस बुक करण्यात आल्या आहेत.

" शालेय सहलीच्या सेवेला अधिक चांगल्या प्रकारे प्राधान्य दिले जाते. त्यासाठी चालकांनादेखील सूचना देण्यात आलेल्या आहेत. विशेष म्हणजे पुढील वर्षाच्याही सहलीचे बुकिंग होत आहे.

**- वर्षा कांबळे, स्थानकप्रमुख, पिंपरी-चिंचवड आगार.**

# पुण्यात महिलांच्या तुलनेत पुरुष मागेच!

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांमध्ये महिलांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण केवळ 3 टक्के

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यासारख्या महानगरात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी पुरुष पुढे येत नसल्याचे चित्र आहे. या वर्षभरात एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत पुण्यात ५ हजार ४०८ महिलांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया झाली असून, ही शस्त्रक्रिया करणाऱ्या पुरुषांची संख्या केवळ २३७ आहे.



महापालिकेच्या आरोग्य विभागाचे एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ साठी १२ हजार ६२ महिलांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट होते. त्यांपैकी ६७ टक्के उद्दिष्ट गाठण्यात यश आले आणि ८ हजार १६५ महिलांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाली. याच कालावधीसाठी १ हजार ९५ पुरुषांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट होते. त्यांपैकी २३ टक्के म्हणजेच २५४ जणांची शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर आरोग्य विभागाचे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीसाठी १३ हजार २०० महिलांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट होते. त्यांपैकी ७४ टक्के म्हणजेच ९ हजार ७१३ जणांची शस्त्रक्रिया झाली. याच कालावधीसाठी १ हजार १०० पुरुषांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट होते. त्यांपैकी ३१ टक्के म्हणजेच ३४८ जणांची शस्त्रक्रिया झाली.

गेल्या काही वर्षांत कुटुंब नियोजन करणाऱ्या पुरुषांची संख्या फारशी वाढत नसल्याचे या आकडेवारीतून समोर आले आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांमध्ये महिलांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण केवळ ३ टक्के आहे.

**पुण्यातील कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया**

कालावधी – महिला – पुरुष

एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ – ८,१५६ – २५४

एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ – ९,७१३ – ३४८

एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ – ५,४०८ – २३७

### पुरुषांची संख्या कमी का?

- कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेबाबत अपुरी माहिती
- शस्त्रक्रियेनंतर लैंगिक क्षमता कमी होते, असा गैरसमज
- पुरुषांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया हास्याचा विषय बनल्याचा फटका
- सरकारी पातळीवर जनजागृती करण्यात अपयश
- स्वयंसेवी संस्थांनाही शस्त्रक्रियायोग्य पुरुषांपर्यंत पोहोचण्यात अडचणी

> पुरुषांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेबाबत समाजात अनेक गैरसमज आहेत. दुसरीकडे, महिलांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याच्या आरोग्य सुविधा सहजपणे उपलब्ध आहेत. पुरुषांना अशा शस्त्रक्रिया कुठे करायच्या, याची फारशी माहिती नसते. पुण्यासारख्या शहरात पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांबाबत जनजागृती करण्यासाठी आमच्यासारख्या संस्थांसाठी कंपन्यांनी दारे खुली करावीत.
>
> **- डॉ. प्रवीण सोनावणे, पुणे शाखाप्रमुख, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया.**

# मुळामुठेत रसायनमिश्रीत दुषित पाण्यामुळे माशांचा मृत्यू

## मुळा-मुठा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात मृत जलचर प्राणी आणि माशांच्या खच

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा-मुठा नदी पात्रात प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मागील नाईक बेट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मृत माशांचा खच आढळल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. नायडू मैला पाणी शुद्धीकरण प्रकल्पाचे पाणी आणि नदी सुधारणेच्या नावाखाली नदीचा कमी झालेले पात्र याला जबाबदार असल्याची आरोप नागरिकांकडून केला जात होता. मुळामुठा नदीमध्ये रसायनमिश्रीत दुषित पाणी आल्याने हाजारो माशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. नाईक बेट परिसरातील नदीच्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवले आहे. हे दुषित पाणी कुठुन आले याचा शोध घेतला जात आहे.



मुळा-मुठा नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात मृत जलचर प्राणी आणि माशांच्या खच सापडल्याने पुण्यातील जलप्रदुषणाकडे महापालिका आणि राज्य सरकारचे लक्ष नसल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकारामुळे पर्यावरण प्रेमींनी प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. मुळा आणि मुठा या दोन नद्यांचा संगमवाडीत संगम होतो. शहरातील मैलामिश्रीत पाणी प्रक्रिया न करता थेट नदीमध्ये सोडले जात असल्याने नदी प्रदूषीत झालेली आहे. मैलमिश्रीत पाणी नदीमध्ये येण्यापासून रोखण्यासाठी महापालिकतर्फे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले आहेत. शहरात दिवसाला किमान ९०० एमएलडी सांडपाणी तयार होत आहे, त्यापैकी प्रतिदिन केवळ ४५० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा नदीत सोडले जाते. पण तरीही ४५० एमएलडी घाण पाणी थेट नदीत येत आहे. मुठा नदीमध्ये फक्त सांडपणी येत आहे. तर मुळा नदीमध्ये पिंपरी-चिंचवड भागातील कंपन्यांमधून सोडले जाणारे रसायनमिश्रीत केलेले विषारी पाणी प्रक्रिया न करता थेट नदीमध्ये येऊन मिसळत आहे. त्यामुळे या नद्यांमधील पाणी सजिवांसाठी धोकादायक आहे.

पुण्यात नदीकाळ सुधार प्रकल्पाचे काम जोरात सुरु आहे. नदीचा काठ सुधारला म्हणजे पुण्याच्या सौंदर्यात मोठी भर पडेल असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. मात्र दुसरीकडे नदीतील पाणी प्रदुषण दिवसेंदिवस वाढत त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया (एसटीपी) करणारे प्रकल्प मोठ्या क्षमतेने सुरु आहेत. मात्र त्यानंतरही जलप्रदुषणामुळे जलचर प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

दरम्यान, मुळामुठा नदीमध्ये संगमवाडीच्या जवळ नाईक बेटाजवळ नदीमध्ये मृत माशांचा खच पडलेला आहे. त्यामुळे प्रचंड दुर्गंधीही या भागात सुटली आहे. याठिकाणी महापालिकेचा नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पदेखील आहे. महापालिका प्रशासनाला याची माहिती मिळाल्यानंतर तेथील पाण्याचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवले आहे. त्याचा अहवाल पुढील दोन ते तीन दिवसात प्राप्त झाल्यानंतर माशांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला आहे हे स्पष्ट होणार आहे.

> मुळामुठा नदीमध्ये माशांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर याच्या कारणाचा शोध घेतला जात आहे. या ठिकाणीतील पाण्याचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठवले आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर नेमके कारण समोर येईल. नायडू सांडपाणी केंद्रातून प्रक्रिया न केलेले पाणी बाहेर आले आहे का याची तपासणी केली असता तसे काही आढळून आलेले नाही. मलनिःसारण विभागाला सांडपाणी वाहिनी फुटली आहे का हे व्यवस्थित तपासणी करण्यास सांगितले. माशांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला आहे हे समोर आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**